जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 FEB 2025
पुढारी




कोल्हापूर : मुंबईतील राजभवनमधील बैठकीवेळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचे स्वागत करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. समवेत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. श्रीकृष्ण महाजन आदी. (छाया : मिलन मकानदार)

# राज्यपालांकडून शिवाजी विद्यापीठ कामकाजाचा आढावा

- **कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडून माहितीचे सादरीकरण**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्यपाल तथा राज्यातील विद्यापीठांचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी शुक्रवारी राजभवन मुंबई येथे शिवाजी विद्यापीठाच्या कामकाजाचा आढावा घेतला.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी विद्यापीठासंदर्भातील माहितीचे सादरीकरण केले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, संशोधन व आंतरराष्ट्रीय सहकार्य, विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट, भाषांतर प्रकल्पांतर्गत कार्य, आंतरवासिता कार्यक्रमाची अंमलबजावणी, अध्यापकांची उपलब्धता, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुविधा, क्रीडा सुविधांचा विकास, 'स्वच्छ भारत अभियान' व विकसित भारत उपक्रमांमध्ये विद्यापीठाचा सहभाग, उद्योग क्षेत्राशी सहकार्य आदी विषयांवर चर्चा झाली. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन शाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. डॉ. अजितसिंह जाधव आदी उपस्थित होते.

23 FEB 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाश्वत विकासासाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक

## डॉ. पी. एस. पाटील : वारणा महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान परिषदेचा समारोप

■ सकाळ वृत्तसेवा

वारणानगर, ता. २२ : शाश्वत विकास साध्य करण्यासाठी व्यक्ती, उद्योग आणि सरकार यांचे सामूहिक प्रयत्न महत्त्वाचे आहेत. यासाठी आत्ताच कृती केल्यास भविष्यासाठी निरोगी पृथ्वी आणि जीवनमानाची चांगली गुणवत्ता सुरक्षित होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयाच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त 'भविष्यासाठी शाश्वत विकास व वैज्ञानिक समन्वय' या विषयावरील दोनदिवसीय राष्ट्रीय विज्ञान परिषदेच्या समारोपप्रसंगी डॉ. पाटील बोलत होते. अध्यक्षस्थानी वारणा विभाग शिक्षण मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. व्ही. व्ही. कार्जीन्नी होते.

डॉ. पाटील म्हणाले, 'पृथ्वीवरील संसाधने मर्यादित असल्याने, भविष्यातील पिढ्यांसाठी त्यांची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी शाश्वत विकास आवश्यक आहे. अक्षय ऊर्जेकडे संक्रमण करून त्याचा जबाबदार वापर पद्धतींचा अवलंब करत नवोपक्रमाला प्रोत्साहन देऊन आपण आर्थिक विकास आणि पर्यावरण संवर्धन संतुलित करू शकतो.'

राष्ट्रीय परिषदेच्या दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात मौखिक संशोधन पत्रिका सादरीकरण झाले. सादरीकरणामध्ये शाश्वत कृषी, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विषयांवर विचारांची देवाण-घेवाण झाली. २७५ शोधनिबंधाचे सादरीकरण झाले. डॉ. पी. बी. पिस्ते, डॉ. आर. डी. माने, डॉ. एस. एस. वाडकर, डॉ. एस. ए. व्हानाळकर, डॉ. एस. टी. दिंडे यांनी परीक्षक म्हणून काम केले.

पहिल्या सत्रामध्ये प्रा. डॉ. आर. बी. पवार यांनी विद्यार्थ्यांना 'केमिस्ट्री अँड सस्टेनेबल एनर्जी रोल ऑफ करंट अँड फ्युचर जनरेशन' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी बॅटरी आणि फ्युएल सेल या संकल्पनेची माहिती सांगितली. दुसऱ्या सत्रामध्ये शिवाजी विद्यापीठाचे मानद शास्त्रज्ञ प्रा. डॉ. एस. आर. यादव यांनी 'रोल ऑफ प्लांट सायन्सेस इन २१ सेंचुरी' या विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले, 'एकविसाव्या शतकात वनस्पती विज्ञानाची भूमिका, प्रजातींचे विविध परिणाम समजून घेऊन सर्वेक्षण, काळजीपूर्वक निरीक्षण, विविध प्रजाती विश्लेषण आवश्यक आहे.'

राष्ट्रीय विज्ञान परिषदेचे संयोजक तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. एम. शेख, परिषदेचे समन्वयक डॉ. बी. एस. शिर्के, संघटन सचिव डॉ. एस. एस. खोत, पीएम-उषा समन्वक प्रा. व्ही. एस. पाटील, संशोधक, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.



वारणानगर : राष्ट्रीय विज्ञान परिषदेच्या समारोपप्रसंगी बोलताना शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. यावेळी डॉ. एस. एस. खोत, डॉ. ए. एम. शेख, डॉ. व्ही. व्ही. कार्जीन्नी, डॉ. बी. एस. शिर्के उपस्थित होते.

### निकाल असा

■ पोस्टर सादरीकरणासाठी रसायनशास्त्र आणि पदार्थ विज्ञानामध्ये अनुक्रमे तीन असे - आफताब गडकरी, आकांशा जगताप, शिल्पा पाटील. मौखिक सादरीकरण - रोहिणी संगणवार, संदीप पिसे, अरविंद पाटील. पोस्टर सादरीकरणासाठी जैवविज्ञान शास्त्र - स्वाती पवार, आकांशा सावंत, ए. ए. पेंढारी. मौखिक सादरीकरण - सना चौगुले, शकील शेख, श्वेता साळोखे. पोस्टर सादरीकरणासाठी - गणित आणि संगणकीय शास्त्र - अनुराधा घोरपडे, शुभम गिरीगोसावी. मौखिक सादरीकरण - मारलोन सिक्वेरिया, संजय मोरे, जीवन परब.

23 FEB 2025 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विसंगती टिपणे चांगल्या विनोदी लेखकाचे लक्षण : खांडेकर

## शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय एकात्मता शिबिर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जीवनातील, मानवी वर्तनातील विसंगतीमधून विनोदाची निर्मिती होते. ही विसंगती नेमकेपणाने टिपणे हे चांगल्या विनोदी लेखकाचे लक्षण असते, असे मत अभिनेते, दिग्दर्शक प्रसाद खांडेकर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठामध्ये सुरू असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी आलेल्या स्वयंसेवकांशी संवाद साधताना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. लेखक, अभिनेते प्रथमेश शिवलकर, रोहित माने यांच्यासह निमति-दिग्दर्शक सुनील नारकर उपस्थित होते.

अभिनेते खांडेकर म्हणाले, चांगल्या विनोदनिर्मितीसाठी लेखक व अभिनेत्याकडे उत्तम निरीक्षणकला असावी लागते. त्यामधून माणसांचे वागणे, बोलणे, त्यांच्या लकबी इत्यादींचे त्याला ज्ञान होते. महत्त्वाचे म्हणजे या वागण्या-बोलण्यातली विसंगती टिपता आली पाहिजे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय एकात्मता शिबिरात बोलताना अभिनेते, दिग्दर्शक प्रसाद खांडेकर. समवेत डावीकडून अभिनेता रोहित माने, निर्माते सुनील नारकर, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजय शिंदे, सुमंतकुमार यादव. (छाया : मिलन मकानदार)

अभिनेते शिवलकर म्हणाले, अनेक राष्ट्रीय एकात्मता शिबिरांतही सहभागी झाल्याने माझ्यात आत्मविश्वास निर्माण झाला. त्या बळावरच अभिनय क्षेत्रातील वाटचाल सुरू आहे. निमति-दिग्दर्शक नारकर म्हणाले, मायभूमीचे, अभिजात मराठी भाषेचे काही देणे लागतो, या भावनेतून देशात परतलो. त्या भावनेतून येथे चित्रपट निर्मिती करण्याचा निर्णय घेतला.

अध्यक्षीय मनोगतात कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, हास्यमालिकेतील अनेक प्रहसनांमधून जीवनातील व्यंगांवर नेमकेपणाने बोट ठेवण्याचे काम ही सर्व अभिनेते करीत आहेत. डॉ. तानाजी चौगुले यांनी स्वागत केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रादेशिक संचालक डॉ. अजय शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. जी. के. कीर्दत यांनी आभार मानले. यावेळी केंद्रीय युवा मंत्रालयाचे यूथ ऑफिसर सुमंतकुमार यादव यांच्यासह एनएसएसचे विविध राज्यांतील कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक उपस्थित होते.

23 FEB 2025
तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवचरित्राच्या प्रेरणेतून राष्ट्रउभारणीस सिद्ध व्हावे

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे आवाहन

प्रतिनिधी
कोल्हापूर

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनचरित्राचे वाचन करून नवयुवकांनी त्यापासून प्रेरणा घ्यावी आणि राष्ट्रउभारणीच्या कार्यामध्ये योगदान देण्यास सिद्ध व्हावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय एकात्मता शिबिराच्या समारोपप्रसंगीत अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. या शिबिरात महाराष्ट्रासह १२ राज्यांतील २१ विद्यापीठांतील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक सहभागी झाले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांचे राष्ट्र उभारणीतील योगदान, त्यांचा सर्वधर्मसमभाव, त्यांची सहिष्णु वृत्ती, सर्वांना समानतेची वागणूक देत स्वराज्यकार्यात सामावून घेण्याची वृत्ती, स्त्रियांप्रती आदरभाव या सर्व गोष्टी आपल्याला विकसित भारताची उभारणी करण्यासाठी प्रेरणादायी आणि आदर्शवत आहेत. हे आदर्श घेऊन भावी जीवनात वाटचाल केल्यास देशाच्या प्रगतीमध्ये योगदान देऊ शकतो. प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, एकमेकांशी निकोप स्पर्धा असणे आवश्यक असतेच, पण त्याहूनही सर्वांनी एकत्र येऊन जिंकण्यातील आनंद हा अधिक निर्मळ असतो. स्पर्धेपेक्षा सहकार्यशील वृत्तीला महत्त्व दिल्यास देशकार्य आणि मानवतावादाची सेवा करणे सहजशक्य आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय एकात्मता शिबिरात स्वयंसेवकांनी आपल्या सादरीकरणातून राष्ट्राला अभिवादन केले.

मान्यवरांच्या हस्ते सहभागी विद्यापीठांच्या संघांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच, विविध स्पर्धांमधील विजेत्यांनाही पारितोषिके प्रदान करण्यात आली. डॉ. पी. एच. विद्यानंद, डॉ. के. सुखुना, डॉ. के. जयप्पा, डॉ. प्रदीप औसेकर, डॉ. कावेरी या अधिकाऱ्यांसह शानूर शेख (गोवा), आदित्य कुमार (दिल्ली), गीतांजली मांगो (पश्चिम बंगाल), मोहिनी पटेल (गुजरात), काव्या (आंध्र प्रदेश) या स्वयंसेवकांनी मनोगते व्यक्त केली.

अजय शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सुमंतकुमार यादव यांनी अहवाल सादरीकरण केले. शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रादेशिक संचालनालयाचे प्रादेशिक संचालक अजय शिंदे, यूथ ऑफिसर सुमंतकुमार यादव उपस्थित होते.

### शिवाजी विद्यापीठाला दोन पारितोषिके

शिवाजी विद्यापीठाच्या स्वयंसेवकांना पारंपरिक वेशभूषेमध्ये द्वितिय आणि पोस्टर सादरीकरणामध्ये तृतीय क्रमांक मिळाला. पारंपरिक वेशभूषेत कोलकता येथील पश्चिम बंगाल विद्यापीठास प्रथम व भुवनेश्वर विद्यापीठ, ओडिशा यांना तृतीय क्रमांक मिळाला. पोस्टर सादरीकरणात पश्चिम बंगालला प्रथम आणि भारती विद्यापीठ, पुणे यांना द्वितिय क्रमांक मिळाला. समूह नृत्य स्पर्धेत जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी विद्यापीठास प्रथम, धारवाडच्या कर्नाटक विद्यापीठास द्वितिय आणि केरळच्या तिरुअनंतपूरम विद्यापीठास तृतीय क्रमांक मिळाला.

23 FEB 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवचरित्राच्या प्रेरणेतून राष्ट्र उभारणीस सिद्ध व्हावे

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के; सांस्कृतिक कार्यक्रम, दीपोत्सवाने राष्ट्रीय एकात्मता शिबिराची सांगता

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनचरित्राचे वाचन करून नवयुवकांनी त्यापासून प्रेरणा घ्यावी आणि राष्ट्र उभारणीच्या कार्यामध्ये योगदान देण्यास सिद्ध व्हावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठात १६ फेब्रुवारीपासून सुरू असलेल्या राष्ट्रीय एकात्मता शिबिराचा शनिवारी समारोप समारंभ झाला, त्यावेळी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

शिबिरात महाराष्ट्रासह १२ राज्यांतील २१ विद्यापीठांतील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक सहभागी झाले. पुणे येथील राष्ट्रीय सेवा योजना प्रादेशिक संचालनालय आणि शिवाजी विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय एकात्मता शिबिरात पारंपरिक नृत्यकला सादर करताना विद्यार्थिनी.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांचे राष्ट्र उभारणीतील योगदान, त्यांचा सर्वधर्मसमभाव, त्यांची सहिष्णू वृत्ती, सर्वांना समानतेची वागणूक देत स्वराज्य कार्यात सामावून घेण्याची वृत्ती, स्त्रियांप्रती आदरभाव या सर्व गोष्टी आपल्याला विकसित भारताची उभारणी करण्यासाठी प्रेरणादायी आणि आदर्शवत आहेत.

प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, एकमेकांशी निकोप स्पर्धा असणे आवश्यक असतेच; पण त्याहूनही सर्वांनी एकत्र येऊन जिंकण्यातील आनंद हा अधिक निर्मळ असतो. स्पर्धेपेक्षा सहकार्यशील वृत्तीला महत्त्व दिल्यास देशकार्य आणि मानवतावादाची सेवा करणे सहजशक्य आहे.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रादेशिक संचालनालयाचे प्रादेशिक संचालक अजय शिंदे यांनी प्रास्ताविक केले. सुमंतकुमार यादव यांनी अहवाल सादरीकरण केले. शिवाजी विद्यापीठाच्या स्वयंसेवकांना पारंपरिक वेशभूषेमध्ये द्वितीय आणि पोस्टर सादरीकरणामध्ये तृतीय क्रमांक मिळाला. विद्यापीठाचे एनएसएस संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, यूथ ऑफिसर सुमंतकुमार यादव प्रमुख उपस्थित होते.

### सांस्कृतिक कार्यक्रम आणि दीपोत्सवाचा उत्साह

शुक्रवारी सायंकाळच्या सत्रात सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण आणि दीपोत्सवाने राष्ट्रीय एकात्मता शिबिरातील उपक्रमांची सांगता करण्यात आली. यावेळी स्वयंसेवकांनी आपापल्या राज्याच्या संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या एकल, समूहनृत्यांचे तसेच प्रबोधनपर लघुनाटिका, नकलांचे सादरीकरण केले. त्यानंतर विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यासमोर भारताच्या नकाशाची रांगोळी काढण्यात आली आणि त्याभोवती दीपांची आरास करून दीपोत्सव साजरा करण्यात आला.

23 FEB 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॅनो टेक्नॉलॉजीमुळे उद्योगांमध्ये क्रांती

■ डॉ. के. वाय. राजपुरे



कोल्हापूर : राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. के. वाय. राजपुरे.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नॅनो टेक्नॉलॉजीमध्ये झपाट्याने होणाऱ्या प्रगतीमुळे नॅनो मटेरियल्स वेगवेगळ्या उद्योगामध्ये क्रांती घडवत आहे. आरोग्य सेवा, इलेक्ट्रॉनिक्स, ऊर्जा आणि पर्यावरण यांसारख्या क्षेत्रांमध्ये नॅनो मटेरियल्सच्या नवीन संशोधनामुळे अधिक कार्यक्षम, टिकाऊ आणि किफायतशीर उपाय शोधले जात आहेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ माजी पदार्थविज्ञान विभागप्रमुख डॉ. के. वाय. राजपुरे यांनी केले. न्यू कॉलेजच्या पदार्थविज्ञान विभागामार्फत आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन डॉ. के. जी. पाटील यांनी सहभागी विद्यार्थ्यांना संशोधनाचे महत्त्व सांगितले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले. कार्यक्रमाला संस्थेचे पदाधिकारी व संचालक, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आर. डी. ढमकले, प्रबंधक एम. वाय. कांबळे आदी उपस्थित होते. पाहुण्यांचा परिचय डॉ. प्रशांत पाटील यांनी करून दिला, तर डॉ, पी. डी. कांबळे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. अनिता मगर-पोवार व कांचन पाटील यांनी केले. यावेळी विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक, संशोधक आणि संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

23 FEB 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर







कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित राष्ट्रीय एकात्मता शिबिरात वीरभद्र नृत्य सादर करताना विद्यार्थी. दुसऱ्या छायाचित्रात पारंपरिक नृत्य सादर करताना कर्नाटक विद्यापीठातील विद्यार्थी-विद्यार्थिनी. तिसऱ्या छायाचित्रात नृत्यकला सादर करताना विद्यार्थिनी.

# युवकांनी शिवछत्रपतींच्या चरित्रातून प्रेरणा घ्यावी

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के: राष्ट्रीय एकात्मता शिबिराचा समारोप

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २२ : 'युवकांनी शिवछत्रपतींच्या चरित्रातून प्रेरणा घेत राष्ट्र उभारणीत योगदान द्यावे', असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शनिवारी येथे केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित राष्ट्रीय एकात्मता शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. पुणे येथील राष्ट्रीय सेवा योजना प्रादेशिक संचालनालय व विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना कक्षातर्फे त्याचे आयोजन केले होते. दरम्यान, समारोप प्रसंगी विविध राज्यांच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. या वेळी दीपोत्सव व पारितोषिक वितरणही झाले.

डॉ. शिर्के म्हणाले, 'शिवछत्रपतींनी स्वराज्य उभारणीत सर्वधर्मसमभावाचा पुरस्कार केला. त्यांची सहिष्णुवृत्ती, सर्वांना समानतेची वागणूक देण्याचा स्वभाव, महिलांविषयी आदरभाव ही गुण वैशिष्ट्ये स्वराज्य उभारणीत मोलाची ठरली. विकसित भारताची उभारणी करण्यासाठी ही गुण वैशिष्ट्ये निश्चितच आदर्शवत आहेत. त्यांचा अंगीकार करून वाटचाल केल्यास समाजाच्या व देशाच्या प्रगतीत योगदान देऊ शकतो.'

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, 'स्पर्धेपेक्षा सहकार्यशील वृत्तीला महत्त्व दिल्यास देशकार्य व मानवतावादाची सेवा करणे सहज शक्य आहे. संस्कृतीमधील प्रतिकामागील वैज्ञानिक तथ्ये समजून घेण्याच्या अनुषंगाने उपक्रम राबविण्याची आवश्यकता आहे. एकमेकांशी स्पर्धा निकोप असणे गरजेचे असून, त्याहूनही सर्वांनी एकत्र येऊन जिंकण्यातील आनंद हा अधिक निर्मळ असतो.' या प्रसंगी डॉ. पी. एच. विद्यानंद, डॉ. के. सुखुना, डॉ. के. जयप्पा, डॉ. प्रदीप औसेकर, डॉ. कावेरी, शानूर शेख (गोवा), आदित्य कुमार (दिल्ली), गीतांजली मांगो (पश्चिम बंगाल), मोहिनी पटेल (गुजरात), काव्या (आंध्र प्रदेश) यांनी मनोगत व्यक्त केले.

यूथ ऑफिसर सुमंतकुमार यादव यांनी अहवाल वाचन केले. सहभागी विद्यापीठांच्या संघांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रादेशिक संचालनालयाचे प्रादेशिक संचालक अजय शिंदे यांनी प्रास्ताविक केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले.

### पारंपरिक वेशभूषेत शिवाजी विद्यापीठ द्वितीय

■ शिवाजी विद्यापीठातील स्वयंसेवकांनी पारंपरिक वेशभूषेत द्वितीय व पोस्टर सादरीकरणात तृतीय क्रमांक पटकाविला. पारंपरिक वेशभूषेत कोलकाता येथील पश्चिम बंगाल विद्यापीठाने प्रथम, ओडिशातील भुवनेश्वर विद्यापीठाने तृतीय क्रमांक मिळवला. पोस्टर सादरीकरणात पश्चिम बंगालने प्रथम, पुण्याच्या भारती विद्यापीठाने द्वितीय क्रमांक पटकावला. समूहनृत्य स्पर्धेत कवयित्री बहिणाबाई चौधरी विद्यापीठाने प्रथम, धारवाडच्या कर्नाटक विद्यापीठ द्वितीय व केरळच्या तिरुअनंतपुरम विद्यापीठाने तृतीय क्रमांक मिळवला.